# RESEARCH PROMOTION SCHEME

## लघु संशोधन प्रकल्प

"तासगाव तालुक्यातील सर्वसमावेशक ग्रामीण विकासाचा अभ्यास"

संशोधन प्रोत्साहन योजना

पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, तासगाव यास

लघु संशोधन प्रकल्प सादर

### सहभागी विद्यार्थी

श्री. शिंदे राहूल मुरलीधर

श्री. माने चंद्रकांत धनाजी

श्री.पाटील ओंकार जर्नादन

श्री. पाटील प्रशांत वसंत

श्री. जमदाडे स्वप्नील तुकाराम


### संशोधक /सादरकर्ते

डॉ. बंडू जयसिंग कदम

(एम. ए.,एम. फिल.,पीएच.डी., पी. जी. डी. सी. जी.)

सहाय्यक प्राध्यापक,समन्वयक(दूर शिक्षण केंद्र)

अर्थशास्त्र विभाग,

पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, तासगाव,

ता. तासगाव, जि. सांगली.

### मार्गदर्शक

डॉ.मिलिंद एस.हुजरे

प्राचार्य,

पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, तासगाव,

ता. तासगाव, जि. सांगली.


2021

# प्रतिज्ञापत्र

''तासगाव तालुक्यातील सर्वसमावेशक ग्रामीण विकासाचा अभ्यास''या विषयावरील लघु संशोधन प्रकल्प मी  पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, तासगाव लिहिला आहे. हा लघु संशोधन प्रकल्प अथवा त्याचा कोणताही भाग मी अन्यत्र कोठेही कोणासही पदवीसाठी अथवा परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

दिनांक

## सहभागी विद्यार्थी

श्री. शिंदे राहूल मुरलीधर

श्री. माने चंद्रकांत धनाजी

श्री.पाटील ओंकार जर्नादन

श्री. पाटील प्रशांत वसंत

श्री. जमदाडे स्वप्नील तुकाराम

संशोधक

डॉ. बंडू जयसिंग कदम

# प्रमाणपत्र

प्रमाणित करणेत येते की, डॉ. बंडू जयसिंग कदम यांनी‘‘**तासगाव तालुक्यातील सर्वसमावेशक ग्रामीण विकासाचा अभ्यास**’’या विषयावरील लघु संशोधन प्रकल्पाचे लेखन समाधानकारकरित्या पूर्ण केले आहे. **डॉ. बंडू जयसिंग कदम** यांनी माझ्या मार्गदर्शनाखाली स्वतंत्ररितीने हा लघु संशोधन प्रकल्प लिहिलेला असून तो इतर कोणत्याही विद्यापीठातील कोणत्याही अन्य पदवी व परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

दिनांक

डॉ.अजय एन.अंभोरे | डॉ. मिलिंद एस.हुजरे

# ऋणनिर्देश

येथे ''तासगाव तालुक्यातील सर्वसमावेशक ग्रामीण विकासाचा अभ्यास'' हा लघु संशोधन प्रकल्प सादर करताना मला विशेष आनंद होत आहे. हा लघु संशोधन प्रकल्प माझ्या प्रेमळ आई-वडीलांच्या आशिर्वादाचे व सर्व गुरुवर्यांच्या प्रेरणेचे मूर्त रुप आहे. या करिता अंतःकरणाची भावना व्यक्त करण्याचे एक माध्यम म्हणून मी आभार प्रदर्शनाचा अवलंब केलेला आहे. कोणतेही महत्वाचे कार्य करावयाचे झाल्यास त्यास सर्वांच्या सहकार्याची जोड आवश्यक असते. सहकार्याशिवाय कोणतेही काम परिपूर्ण होत नाही. हा लघु संशोधन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी ज्यांचे सहकार्य व मदत मिळाली त्यासर्वांचा ऋणी आहे हे आभार व्यक्त करणेसाठी केलेला हा प्रामाणिक प्रयत्न आहे.

आमच्या संस्थेच्या संस्थापक डॉ. बापूजी साळूंखे, संस्थामाता सुशिलादेवी साळुंखे यांच्या आशिर्वादामूळेहे कार्य शक्य झाले आहे. त्याच प्रमाणे आमच्या संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव सौ. शुभांगीताई गावडे, सहसचिव प्राचार्य डॉ. आर. व्ही. शेजवळ, सहसचिव प्राचार्य डॉ. वाय. ए. भोसले यांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मिलिंद एस हुजरे यांच्या बहूमुल्य मार्गदर्शनामुळे आणि आशिर्वादामूळे हे संशोधनकाम पूर्ण करु शकलो. त्यांनी माझ्या साठी दिलेला बहुमुल्य वेळ व वेळोवेळी केलेल्या महत्वपूर्ण सूचना यामूळेच हा लघु संशोधन प्रकल्प पूर्ण होऊ शकला. त्यांचे ऋण मी कोणत्याच शब्द गुच्छाने फेडू शकत नाही. म्हणून मी त्यांचे आभार मानतो व त्यांच्या ऋणात राहणे मी माझे भाग्य समजतो.

माझ्या संशोधनकार्यास ज्यांनी गती दिली ते गुरुवर्य व ज्येष्ठ अर्थतज्ञ मा. डॉ. जे. एफ. पाटील यांच्या अनमोल मार्गदर्शनामुळे लघु संशोधन प्रबंधाचे काम पूर्ण झाले. ज्यांनी माझ्या संशोधन कार्यास खऱ्या अर्थाने प्रेरणा दिली ते माझे गुरुवर्य प्राचार्य डॉ.जे. एस. पाटील (माजी अधिष्ठाता, सामाजिक शास्त्रे, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, प्राचार्य कला,वाणिज्य महाविद्यालय नागठाणे) यांच्या सहकार्यामूळेच व वारंवार केलेल्या

मार्गदर्शनामूळे माझे संशोधनाचे हे कार्य पूर्ण झाले. त्यांच्या व्यासंगी व निरपेक्ष मार्गदर्शनामूळे मला लाभ मिळाला. त्यांचा मी मनस्वी ऋणी राहीन.

त्याचप्रमाणे संशोधन प्रोत्साहन समितीचे प्रमुख डॉ. अजय अंभोरे यांचे अनमोल मार्गदर्शन आणि सहकार्य लाभले त्याबददल मी त्यांचा आभारी आहे.

आमच्या अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख आणि उपप्राचार्य श्री.जे.ए.यादव यांनी वेळोवेळी केलेल्या मदतीमुळे हा प्रकल्प पूर्ण होऊ शकला. त्याचे आभार मानने हे माझे परम कर्तव्य समजतो. माझे परममित्र डॉ.के.एन.पाटील, महाविद्यालयीन नॅक समन्वयक डॉ. अलका इनामदार , डॉ.शहाजी पाटील, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. अमोल सोनवले, प्रा.मिलिंद पाटील,डॉ. जीवन घोडके ,डॉ. विनोदकुमार कुंभार, डॉ, अर्जुन कुंभार, यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

त्याचप्रमाणे डॉ. उषादेवी साळुंखे (वाणिज्य विभाग प्रमुख, काकासाहेब चव्हाण महाविद्यालय, तळमावले, पाटण) आणि श्रीवर्धन दादासाहेब सुर्यवंशी यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

संशोधन प्रकल्पाचे काम पूर्ण करण्यासाठी माझ्या पाठीशी नेहमी सावली प्रमाणे उभी राहणारी माझी अर्धागणी सौ. अश्विनी कदम हीचे सहकार्य लाभले.चि. गिरीराज अमर शिंदे (इस्लामपूर), चि. पार्थ शिंदे, चि. यशस्वी कदम याचेही सहकार्य लाभले. आई व तात्या यांच्या आशिर्वादामुळेच हा प्रकल्प पूर्णत्वास गेला. त्याचप्रमाणे माझ्या संशोधन कार्यामध्ये प्रा. एकता दिलीप जाधव (मोठी भगिणी) यांचा आशिर्वाद नेहमी मला प्रोत्साहीत करत होता. त्याचप्रमाणे हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी ज्यांचे सहकार्य लाभले मी त्यांचे मनपूर्वक आभार मानतो. पूर्ण प्रकल्पाचे टायपिंगची जबाबदारी सौ. अश्विनी बंडू कदम यांनी करुन दिली त्यांचे मनपूर्वक आभार.

**(डॉ. बंडू जयसिंग कदम)**

# अनुक्रमणिका


| प्रकरण | शीर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| I | प्रतिज्ञापत्र | |
| II | ऋणनिर्देश | |
| III | तक्त्यांची यादी | |
| IV | आलेखांची यादी | |
| **पहिले** | **प्रस्तावना आणि संशोधनपद्धती** | 1 ते 8 |
| 1.1 | प्रस्तावना | 1 |
| 1.2 | सर्वसमावेशक विकास | 1 |
| 1.3 | प्रस्तुत संशोधनाचे वेगळेपण | 3 |
| 1.4 | संशोधन अभ्यासाची व्याप्ती | 3 |
| 1.5 | संशोधन समस्या विधान | 4 |
| 1.6 | संशोधन अभ्यासाचे महत्व | 4 |
| 1.7 | अभ्यासाची उद्दिष्टे | 5 |
| 1.8 | अभ्यासाची गृहितके | 5 |
| 1.9 | संशोधन पध्दती व तथ्य संकलन | 6 |
| 1.10 | अभ्यासाचा कालावधी | 6 |
| 1.11 | अभ्यासाच्या मर्यादा | 6 |
| 1.12 | प्रकरण रचना | 6 |
| 1.13 | उपसंहार | 7 |
| **दुसरे** | **संबंधित साहित्याचा आढावा** | 9 ते 26 |
| 2.1 | प्रस्तावना | 9 |
| 2.2 | संबंधित साहित्याचा आढावा | 9 |
| 2.3 | प्रस्तुत संशोधनाचे वेगळेपण | 14 |
| 2.4 | संशोधनाची उपयुक्तता | 14 |
| 2.4 | उपसंहार | 15 |
| 2.5 | संदर्भ | 16 |
| **तिसरे** | **तासगाव तालुक्याची आर्थिक व सामाजिक माहिती** | 18 ते 25 |
| 3.1 | प्रस्तावना | 18 |
| 3.2 | सांगली जिल्हयाची माहिती | 18 |
| 3.3 | तासगाव तालुक्याची माहिती | 19 |
| 3.4 | तासगाव तालुक्यातील अभ्यासासाठी निवडलेल्या ग्रामपंचायतीची माहिती | 24 |
| 3.5 | **उपसंहार** | 25 |
| **चौथे** | **सर्वसमावेशक ग्रामीण विकासाच्या योजना** | 26 ते 49 |
| 4.1 | प्रस्तावना | 26 |
| 4.2 | सर्वसमावेशक ग्रामीण विकासाच्या योजना | 26 |
| 4.3 | सर्वसमावेशक ग्रामीण विकास योजना मूल्यमापन | 47 |
| 4.8 | उपसंहार | 49 |

| | | |
|---|---|---|
| **पाचवे** | **माहितीचे विश्लेषण आणि तथ्याचे निर्वाचन** | 50 ते 80 |
| 5.1 | प्रस्तावना | 50 |
| 5.2 | माहितीचे विश्लेषण | 50 |
| 5.3 | योजनांची उपयुक्तता वाढविण्यासाठी सुधारणा | 75 |
| 5.4 | सर्वसमावेशक ग्रामीण विकासासाठी उपाययोजना | 78 |
| 5.5 | उपसंहार | 80. |
| **सहावे** | **निष्कर्ष आणि शिफारशी** | 81 ते 88 |
| 6.1 | प्रस्तावना | 81 |
| 6.2 | अभ्यासलेल्या सर्वसमावेशक ग्रामीण योजना आणि त्यांचे यश अपयश | 82 |
| 6.3 | गृहीतकांची पडताळणी | 82 |
| 6.4 | निष्कर्ष | 84 |
| 6.5 | शिफारशी | 87 |
| 6.6 | पुढील संशोधनासाठी ची दिशा | 88 |
| 6.7 | उपसंहार | 88 |
| | संदर्भसूची | 89 ते 90 |
| | **परिशिष्ट** | |
| | **प्रश्नावली** | 91 ते 94 |

# लघु संशोधन प्रकल्प

# सारांश

## प्रस्तावना

भारत हा खेड्यांचा शांतताप्रिय देश आहे. पश्चिमेकडे चला शहरांकडे चला खेड्यांकडे चला यामध्ये खेड्यांकडे चला हा संदेश जास्त महत्त्वाचा वाटतो. कारण शहरांच्या तुलनेत खेड्यांमध्ये आजही अधिक जिवंतपणा पहावयाला मिळतो आहे. सर्वसमावेशक ग्रामीण विकासाबाबत मागच्या पिढ्यांनी मोठे योगदान दिले आहे हे आणि वर्तमान पिढीचे योगदान सुरू आहे. परंतु मागच्या काही दशकापासून सुरू असलेला विकास हा सर्वसमावेशक विकास आहे किंवा नाही हे तपासणे अत्यंत गरजेचे आहे. स्वातंत्र्यानंतर अनुकूल आणि प्रतिकूल घटना घडलेल्या दिसून येतात. अनुकूल घटनांमध्ये राज्यघटना, निती आयोग, केंद्रीय बँकांचे राष्ट्रीयीकरण, हरितक्रांतीचा प्रयोग, बँकांचे राष्ट्रीयीकरण, अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण, तंत्रज्ञानामधील क्रांती ती इत्यादी अशा अनुकूल घटना तर प्रतिकूल घटनांमध्ये भारत चीन युद्ध, भारत पाकिस्तान युद्ध, राष्ट्रव्यापी दुष्काळ, राष्ट्रीय आणीबाणी, 1990 चे मोठे आर्थिक संकट, बेरोजगारी दारिद्र्य,भ्रष्टाचार यामध्ये अनुकूल घटना पेक्षा प्रतिकूल घटनांचा मोठा प्रभाव असल्यामुळे पुढे 1991 मध्ये खाउजा धोरणाचा प्रभाव सुरू झाला आणि त्यामुळे होत असलेला विकास देशात राज्यात जिल्ह्यात तालुक्यात आणि गावात सर्वसमावेशक आहे का? या संपूर्ण वातावरणामुळे ग्रामस्थांची अंतिम आणि प्रत्यक्ष कार्यक्षमतेत फरक आहे काम फरक असेल तर गळत्या दुरुस्ती करण्यासाठी कोणते उपाय वापरता येईल या संपूर्ण बाबींचे आर्थिक अध्ययन करण्यासाठी हा विषय संशोधन प्रकल्पासाठी निवडण्यात आला आहे.

## सर्वसमावेशक विकास

कोंबडी आणि तिची पिल्ले कोंबडी आपल्या पिलाचा सांभाळ करीत असताना जी भूमिका व पिल्ले जे सहकार्य करतात, कोंबडी प्रत्येक पिल्लांची काळजी घेते आणि विशेषतः दुर्बल पिल्लांची विशेष काळजी घेत येईल, सामान्य व संकट परिस्थितीत सर्व पिलांना एकत्र घेते व जो सुटलेला आहे त्याची ची विशेष काळजी घेताना दिसते, एकमेकांना करीत असलेले सहकार्य सर्वसमावेशक विकास आणि सर्वसमावेशक ग्रामीण विकासाचे चांगले उदाहरण आहे, थोडक्यात ग्रामीण परिसरातील सर्वाचा विशेष स्थान दुर्बल घटकांचा विकास किंवा सर्वाची प्रगती म्हणजे

सर्वसमावेशक ग्रामीण विकास होय. सर्वसमावेशक ग्रामीण विकास म्हणजे विकासापासून वंचित असणाऱ्या घटकांना विकासामध्ये समाविष्ट करणे होय.

समाजातील सर्व घटकांसाठी व्यापक तत्त्वावर आधारित लाभाची आणि समान संधीची सुनिश्चितता करणारी वृद्धीची प्रक्रिया म्हणजे सर्वसमावेशक वाढ होय. थोडक्यात ही वाढीची प्रक्रिया विस्तृत प्रकारची, सर्वामध्ये विभागली जाणारी आणि गरिबीसन्मुख असणारी असेल असे करण्यात आलेली आहे.

अकराव्या पंचवार्षिक योजनेनुसार सर्वसमावेशक वाढीची व्याख्या पुढीलप्रमाणे आहे. समाजातील सर्व घटकांसाठी व्यापक तत्त्वावर आधारित लाभाची आणि समान संधीची सुनिश्चितता करणारी वृद्धीची प्रक्रिया म्हणजे सर्वसमावेशक वाढ होय. थोडक्यात ही वाढीची प्रक्रिया विस्तृत प्रकारची, सर्वामध्ये विभागली जाणारी आणि गरिबीसन्मुख असणारी असेल असे करण्यात आलेली आहे. सरकारने वाढीची प्रक्रिया सर्वसमावेशक व समन्यायी करण्यासाठी विविध प्रकारच्या विकासात्मक योजना सुरु केलेल्या आहेत. या योजना दारिद्र्यनिर्मूलन, गटामधील समानता, प्रादेशिक समानता, पर्यावरण शाश्वतता, शिक्षण व आरोग्य, शाश्वत पद्धतीने शेतीची वाढ, आर्थिक समावेशकता, पायाभूत सुविधा या क्षेत्राशी संबंधित आहेत ज्यामुळे होणारी वृद्धीची प्रक्रिया सर्वसमावेशकतेच्या दिशेने होणारी असेल.

भारताने 1991 नंतर आर्थिक उदारीकरणाच्या नीतीचा अवलंब केल्यानंतर आर्थिक वृद्धी आणि विकासाच्या प्रक्रियेला अधिक चालना मिळालेली आहे. आर्थिक उदारीकरण सुरु झाल्यापासून भारतात मध्यम वर्गाची वाढ वेगाने झाल्याचे दिसत आहे. तरीही जागतिक स्तरावर आपली अर्थव्यवस्था अजून कनिष्ठ मध्यमवर्ग या गटातच मोडते. देशाच्या विकासाचा विचार करत असताना आजवर दरडोई उत्पन्नाचा वाढणारा दर, अर्थव्यवस्था वाढीचा दर, उत्पादनवाढीचा दर, आयात-निर्यात व्यापारातील तूट, वित्तीय तूट अशा मुद्द्यांचाच प्रामुख्याने विचार केला जात होता. अशा आर्थिक प्रगतीचे लाभ सर्व नागरिकांपर्यंत पोहचतात की नाही याकडे विशेष लक्ष दिले गेलेले नव्हते. पण सद्यःस्थितीमध्ये आर्थिक विकास समाजाच्या सर्व स्तरापर्यंत एकसमान पद्धतीने करता यावा आणि जे लोक या आर्थिक विकासात्मक प्रक्रियेपासून वंचित राहिलेले आहेत त्यांना या विकासात्मक प्रक्रियेत सामावून घेतले गेले आहे. एकूणच देशाच्या आर्थिक विकासात्मक प्रक्रियेला सर्वसमावेशक बनविण्यासाठी सरकारमार्फत विविध धोरणे व योजनांची आखणी करण्यात आलेली आहे. हे सर्व काही सर्वसमावेशक वाढ साध्य करण्याच्या धोरणाचा भाग आहे.

अलीकडील काळामध्ये सर्वसमावेशक वाढ हा घटक आर्थिक विकास प्रक्रियेतील धोरणाचा महत्त्वाचा भाग बनविण्यात आलेला आहे. आर्थिक वृद्धी जर सर्वसमावेशक असेल तरच अधिक प्रमाणात आर्थिक संधी प्राप्त करता येतील. तसेच याच्या जोडीला सर्वांना समान स्वरूपात संधी सुनिश्चित करता येतील, ज्याद्वारे शाश्वत वाढ साध्य करता येईल हा मुख्य उद्देश सरकारच्या सर्वसमावेशक वाढीच्या धोरणात्मक नीतीचा भाग आहेय सरकारमार्फत 11व्या आणि 12 व्या पंचवार्षिक योजनांमध्ये सर्वसमावेशक वाढ साध्य करण्यासाठी विशेष भर देण्यात आलेला आहे. ज्यामुळे आर्थिक आणि सामजिक सक्षमीकरणाचे ध्येय साध्य करता येऊन आर्थिक विकासाची प्रक्रिया अधिक प्रमाणात उत्पादनक्षम बनवता येईल. हा अंतिम उद्देश ठेऊन सर्वसमावेशक वाढीच्या धोरणाची रणनीती सरकारमार्फत आखण्यात आलेली आहे.

**प्रस्तुत संशोधनाचे वेगळेपण -**

आजपर्यंत विकासाबाबत अनेक संशोधन विविध माध्यमातून झाले आहेत. पण सर्वसमावेशक ग्रामीण विकासावर अगदी नगन्य अशा स्वरुपात संशोधने झाली आहेत. आजच्या घडीला ग्रामीण भागातील समस्या जटील बनत चालल्या आहेत. याविषयावर अद्यापही फारसे संशोधन झालेले दिसून येत नाहीत. त्याच प्रमाणे ग्रामीण विकासाविषयीच्या समाजातील स्थान, त्यांच्या सामाजिक समस्या, आर्थिक समस्या या समाजापुढे आलेल्या नाहीत. त्याचप्रमाणे धोरणात्मक उपाययोजना त्यांच्या समस्येवरती होणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रस्तुत संशोधनात तासगाव तालुक्यातील सर्वसमावेशक ग्रामीण विकासाचा सखोल अभ्यास करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**संशोधन अभ्यासाची व्याप्ती :-**

या अभ्यासाचे शीर्षक, ''तासगाव तालुक्यातील सर्वसमावेशक ग्रामीण विकासाचा अभ्यास'' असे आहे. हा अभ्यास करताना प्रामुख्याने तासगाव तालुक्यातील मानवी विकास निर्देशांक केला आहे. संदर्भसहित अभ्यास म्हणून सांगली जिल्हयातील इतर 11 तालुक्यांचा संक्षिप्त अभ्यास केला आहे. त्याचबरोबर महाराष्ट्र राज्याचा ग्रामीण विकासाचा ही विचारात घेतला केला आहे. तासगाव तालुक्यातील सर्वसमावेशक ग्रामीण विकासाचा अभ्यास करताना लोकसंख्या, शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा, वीजपुरवठा, बँका, विमा, पोस्ट, वाहतुक-दळणवळण इत्यादी घटकाचा अभ्यास केला आहे. त्यामुळे या अभ्यासाचे महत्व वाढते.

**संशोधन समस्या विधान**

संशोधक ग्रामीण भागात जन्मला असल्यामुळे ग्रामीण भागातील समस्या आणि व्यथा जवळून पाहिल्या आहेत.त्याचबरोबर शहरी भागात नोकरी करत असल्यामुळे शहरी भागात झालेला विकास पाहिला आहे. पण शहरी भागाच्या तुलनेने ग्रामीण भागाचा विकास झालेला नाही हेसत्य आपणास स्वीकारावे लागते.एवढेच नव्हे तर शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक स्थितीत मागासलेपणा दिसून आला आहे. म्हणजेच ग्रामीण भागाचा विकास झालेला नाही.खऱ्या अर्थाने सर्वसमावेशक ग्रामीण विकासाची गरज पाहता सदर विषय अभ्यासासाठी घेतला आहे.

ग्रामीण भागाच्या विकासासाठी शासकीय योजना राबविल्या जातात तरीही ग्रामीण आणि शहरी भागाच्या विकासात तफावत का दिसून येते? ती दूर करण्यासाठी अजून कोणते प्रयत्न करणे गरजेचे आहे?

सर्वसमावेशक ग्रामीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या योजना गरजू लाभार्थीपर्यंत पोहचात का?

सर्वसमावेशक ग्रामीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या अंमलबजावणीत काय त्रुटी आहेत का?त्यामध्ये काय सुधारणा करता येतील का?

ग्रामीण विकासाचे महत्व आपल्या अर्थव्यवस्थेत अनन्यसाधारण आहे. ग्रामीण भागाच्या विकासाशिवाय विकासाचे स्वप्न अशक्य आहे. परंतु आज म्हणवा तसा ग्रामीण भागाचा विकास झालेला नाही. आज मोठया समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्याचप्रमाणे सर्वच घटकाचा समावेश विकासामध्ये झालेला नाही. अशा घटकाचा समावेश होणे गरजेचे आहे. तासगाव तालुक्यातील ग्रामीण भागातील समस्या जाणून घेण्यासाठी प्रस्तुत अभ्यास करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**संशोधन अभ्यासाचे महत्व**

सर्वसमावेशक वृद्धी व कल्याणकारी राज्य या दोन्ही संकल्पना परस्परपूरक आहेत. या दोन्ही संकल्पनांचा विचार नव्याने होत असला तरी प्राचीन काळापासून वेगवेगळ्या स्वरूपात या संकल्पना चालत आलेल्या आहेत. रामराज्य कौटिल्याची आदर्श शासन व्यवस्था तर आधुनिक काळात ए.पी.जे. अब्दुल कलाम, डॉक्टर एम. एस. स्वामीनाथन व वर्गीस कुरियन यांच्या स्वप्नातील भारत या संकल्पनांचा मूळ गाभा कल्याणकारी राज्य व सर्वसमावेशक वृत्ती आहे. तसेच राममोहन लोहिया, अब्राहम लिंकन अमर्त्यकुमार सेन, माल्थस लुथर किंग, नेल्सन मंडेला या

महान विचारवंतांचा दृष्टिकोन कल्याणकारी राज्य होता. यावरून असे लक्षात येते की, प्रत्येक अर्थव्यवस्थेत सुरुवातीपासूनच सर्वसमावेशक विकासाचा प्रवास सुरू आहे आणि दैनंदिन जीवनात लोकांनी त्यांची जीवन जगण्याची व काम करण्याची पद्धत बदलणे म्हणजे सर्वसमावेशक ग्रामीण विकास होय. ज्या प्रक्रियेमुळे ग्रामीण भागातील शेवटच्या व्यक्तीला आर्थिक-सामाजिक अशा सर्व जीवनात सुधारणा घडवून आणण्यासाठी संधी मिळते. असा व्यापक प्रयत्न म्हणजे ग्रामीण सर्वसमावेशक विकास होय.

थोडक्यात तासगाव तालुक्यामध्ये आज की ग्रामीण विकास म्हणावा तशा प्रमाणात झालेला नाही .म्हणजेच बरेच घटक विकासापासून वंचित आहेत. अशा घटकांना विकासामध्ये समाविष्ट करण्यासाठी सदर प्रकल्पामध्ये हा विषय निवडला आहे.

**अभ्यासाची उद्दिष्टे :-**

1. ग्रामीण संस्कृतीचे सर्वसमावेशकता हे वैशिष्ट्य आहे याचा अभ्यास करणे.

2. सर्वसमावेशक ग्रामीण विकासासाठी राबविण्यात योजनांचा अभ्यास करणे.

3. सर्वसमावेशक ग्रामीण विकासामधील सामाजिक, आर्थिक, वित्तीय, पर्यावरणीय घटकांचा अभ्यास करणे.

4. सर्वसमावेशक विकास साध्य करताना येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करणे.

5. तासगाव तालुक्यातील सर्वसमावेशक ग्रामीण विकासासाठी उपाययोजना सुचवणे.

**अभ्यासाची गृहितके:-**

1. सर्वसमावेशक ग्रामीण विकासासाठी शासकीय योजना उपयुक्त आहेत.

2. सर्वसमावेशक ग्रामीण विकास योजना योग्य पद्धतीने राबवणे गरजेचे आहे.

3.सर्वसमावेशक ग्रामीण विकास योजना गावपातळीवर राबविणे गरजेचे आहे.

4.शासनाच्या विकास योजना आर्थिक आणि सामाजिकदृष्टया दुर्बल घटकासाठी उपयुक्त आहेत.

**संशोधन पध्दती व तथ्य संकलन :-**

प्रस्तुत संशोधन प्रकल्पासाठी प्राथमिक आणि दुय्यम सामुग्रीचा वापर करण्यात आला आहे. प्राथमिक सामग्रीमध्ये अनुसूची या तंत्राचा वापर करण्यात आला आहे. तर दुय्यम सामग्री साठी इंटरनेट, वेगवेगळ्या समितीचे अहवाल, संदर्भ ग्रंथ, वर्तमानपत्रे, प्रसिद्ध मासिके अशा निवडक साधनांचा वापर करण्यात आला आहे.

**नमुना निवड :-**

नमुना निवडीसाठी गैर संभाव्यता पद्धतीमधील सहेतुक नमुना पद्धतीचा वापर करून नमुना निवड केली आहे. या अभ्यासाकरिता तासगाव तालुक्यातील प्रत्येक गावातून 5 कुटुंबांची निवड करण्यात येणार आहे. तासगाव तालुक्यात एकूण 67 गावे असल्यामुळे अशा रीतीने संपूर्ण राशीतून 335 नमुना निवडण्यात येणार आहेत.

**सांख्यिकी साधने :-**

संकलित प्राथमिक आणि दुय्यम तथ्याचे विश्लेषण करण्यासाठी सरासरी, शेकडेवारी, गुणोत्तर, वृध्दीदर इत्यादी सांख्यिकी तंत्राचा वापर करण्यात येणार आहे.

**अभ्यासाचा कालावधी :-**

अभ्यासासाठी निवडलेला कालावधी हा सन 2019 ते 2021 पर्यत असून तो 2 वर्षे आहे.

**अभ्यासाच्या मर्यादा :-**

प्रस्तुत अभ्यास विषय भौगोलिकदृष्टया सांगली जिल्हयातील तासगाव तालुक्यापुरता मर्यादित आहे. हा अभ्यास करताना तालुक्यातील प्रत्येक गावातील 5 कुंटुबाची निवड करण्यात येणार आहे.

**प्रकरण रचना :-**

प्रकरणनिहाय सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे विशद करण्यात आले आहे.

1) **प्रस्तावना आणि संशोधन पध्दती**

संशोधन प्रकल्पाच्या पहिल्या प्रकरणामध्ये स्त्रियांचा सामाजिक दर्जा, एकल स्त्रिया, संशोधन समस्या विधान, संशोधन अभ्यासाची व्याप्ती, संशोधन अभ्यासाची आवश्यकता,

अभ्यासाची उद्दिष्टे, अभ्यासाची गृहितके, संशोधन पद्धती व तथ्य संकलन अभ्यासाचा कालावधी, अभ्यासाच्या मर्यादा इत्यादी घटकांचे विवेचन करण्यात येणार आहे.

2) **संबंधित साहित्याचा आढवा**

प्रस्तुत प्रकरणात संशोधन साहित्य आढाव्याचा हेतू, संबंधित साहित्य आढाव्याचे महत्त्व, संदर्भ ग्रंथ, संशोधन निबंध, वर्तमानपत्रातील लेख, विविध समित्यांचे अहवाल इत्यादींचा आढावा, संशोधनाचे वेगळेपण इत्यादींचा समावेश करण्यात येणार आहे.

3) **तासगाव तालुक्याची आर्थिक व सामाजिक माहिती**

सदर प्रकरणात तासगाव तालुक्याचे भौगोलिक, ऐतिहासिक, राजकीय, सामाजिक आर्थिक आणि लोकसंख्या विषयक माहिती घेण्यात येणार आहे.

4) **सर्वसमावेशक ग्रामीण विकासाच्या योजना**

सदर प्रकरणात महाराष्ट्र शासनामार्फत राबविण्यात विविध योजनांचा सविस्तर आढावा घेण्यात आला आहे.

5) **तथ्याचे निर्वाचन आणि सादरीकरण**

प्रस्तुत प्रकरणात तासगाव तालुक्यातील सर्वसमावेशक ग्रामीण विकासाची माहिती, त्यांची सामाजिक स्थिती, आर्थिक स्थिती, गृहितकाची चाचणी इत्यादींचा विचार करण्यात येणार आहे.

6) **निष्कर्ष आणि शिफारशी**

संशोधन प्रकल्पाच्या प्रकरणात प्रमुख निष्कर्ष,उपाययोजना, भविष्यकालीन अभ्यासाची दिशा इत्यादींचा समावेश करण्यात येणार आहे.

प्रस्तुत प्रकरणात संशोधन पध्दतीचा आढावा घेण्यात आला आहे.यामध्ये सर्वसमावेशक विकासाची संकल्पना,अभ्यासाची उदिदष्टे,गृहितके, अभ्यासाचे महत्व, संशोधन समस्या आणि संशोधन पध्दतीचा सविस्तर आढावा घेण्यात आला आहे.

संशोधनात जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येणाऱ्या ग्रामीण विकास योजनांचे मूल्यमापन केले आहे. त्यासाठी संशोधन विषयाची सैद्धांतिक ओळख स्पष्ट करताना ग्रामीण

विकासाचे स्वरूप ग्रामीण विकास योजना आणि ग्रामीण विकासाबाबत धोरण व प्रशासन या बाबतची सखोल चर्चा संशोधन प्रकल्पात केली आहे. तसेच संशोधन विषयाशी संबंधित निवडक संशोधक व अभ्यासकांनी केलेल्या संशोधनाचा मागोवा घेतला आहे प्रस्तुत संशोधनात शासनाच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या अंमलबजावणी आणि उपयुक्तता याबाबतचा आढावा घेतला आहे.

संशोधनाचा सारांश प्रस्तुत संशोधन हे शासनाच्या माध्यमातून राबविण्यात आलेल्या सर्वसमावेशक ग्रामीण विकास योजनांच्या अंमलबजावणीशी संबंधित आहे. भारत हा खेड्यांचा देश असून भारताचा विकास म्हणजेच खेड्यांचा विकास असे गृहित धरले जाते. भारत सरकारने पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून भारताच्या ग्रामीण विकासाला पूरक ठरणारे उपक्रम राबविले सामूहिक विकास योजना आणि राष्ट्रीय विस्तार योजना यांच्या माध्यमातून विविध कार्यक्रम राबवले. मात्र ते यशस्वी झाले नसल्याचे स्पष्ट झाल्याने बलवंतराय मेहता समितीच्या शिफारशीनुसार या योजनांच्या अंमलबजावणीसाठी स्थानिक स्वराज्य संस्था स्थापन करण्यात आल्या त्यामुळे सरकारच्या योजना गावपातळीपर्यंत राबविणे सोपे झाले. तसेच स्थानिक पातळीवरील लोकप्रतिनिधी मुळे व स्थानिक स्वराज्य संस्थांत मुळे केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजना गावपातळीपर्यंत पोहोचल्या.

भारतामध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी, पंडित नेहरू पासून अलीकडील श्री आण्णा हजारे, डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम इत्यादींनी सर्वसमावेशक ग्रामीण विकासाबाबत मौलिक विचार मांडले. महात्मा गांधींनी लोकशाही विकेंद्रीकरण आणि ग्रामीण विकास व सामान्य माणूस केंद्रबिंदू मानला. पंडित नेहरूंनी ग्रामीण विकासासाठी कृषी सिंचन दळणवळण याबाबतच्या सुधारणांना महत्त्व दिले. त्यानंतरच्या राजकीय नेतृत्वाने हीच भूमिका स्वीकारली.

**अभ्यासलेल्या सर्वसमावेशक ग्रामीण योजना आणि त्यांचे यश अपयश**

प्रस्तुत संशोधनामध्ये अभ्यास असलेल्या सव्रसमावेशक ग्रामीण योजनांचे यश अपयश लक्षात घेता संशोधनातून पुढील बाबी समोर आल्या.

- एक ग्रामीण क्षेत्रातील बहुतांश जनता निरक्षर असल्याने या विकास योजनांबाबत ग्रामीण भागात फारशी जनजागृती झालेली नाही हे जरी वास्तव असले तरी ग्रामीण भागातील अनेक शिक्षित लाभार्थ्यांनी या योजनांची स्वतः माहिती घेऊन त्यांचा लाभ घेतला आहे.

- जातीनिहाय लाभार्थ्यांचे प्रमाण अभ्यासले असता योजनेच्या लाभार्थ्यांमध्ये ठराविक जातीच्या लोकांची संख्या जास्त आढळून आली म्हणजेच स्थानिक पातळीवर जात ही महत्त्वाची बाब असते. राजकारणावर प्रभुत्व असणाऱ्या जातीच्या लोकांनी त्यांच्या जवळच्या नातेवाईकांना या योजनांचा लाभ मिळवून दिलेला दिसून येतो असे जरी असले तरी या विकास योजनांचा वंचित जात समूहांना देखील चांगला लाभ झालेला दिसून येतो. वंचित समाजातील जनतेला स्वतःच्या सर्वांगीण विकासासाठी या योजनांचा संधी म्हणून वापर करता आला.

- सर्वसमावेशक ग्रामीण विकास योजनांमध्ये लाभार्थ्यांमध्ये लिंग गुणोत्तर प्रमाण तपासले असता पुरुषांपेक्षा स्त्रियांना योजनांचा लाभ कमी प्रमाणात मिळाल्याचे निदर्शनास आले. यामुळे या योजना मागील महिला विकास हा मुद्दा मागेच राहतो

- सर्वसमावेशक ग्रामीण विकास योजना राबवित असताना पात्रतेचे निकष काटेकोरपणे पाळले जात नाहीत आणि त्यामुळे योजनांचे खरे लाभार्थी या लाभापासून वंचित राहतात असे दिसून येते. संशोधनातून शासनामार्फत राबविल्या जाणाऱ्या सर्वसमावेशक ग्रामविकासाच्या योजनांमधील त्रुटी आणि अपयशाची बाजू समोर येत असली तरी उपरोक्त संशोधनातून या योजनांचे महत्त्व अधोरेखित होते या लघु संशोधन प्रकल्पात जागोजागी नमूद केले आहे. त्या सर्वसमावेशक ग्रामीण विकास योजनांचे ग्रामीण विकासात योगदान राहिले आहे हे या संशोधनातून पुढे आले आहे.

**गृहीतकांची पडताळणी**

गृहीतकांची पडताळणी पुढीलप्रमाणे

**गृहीतक क्र:1**

**ग्रामीण विकासासाठी शासकीय विकास योजना उपयुक्त आहेत**

भारताने कल्याणकारी राज्याची संकल्पना स्वीकारली असून त्याचा प्रत्यय भारतीय राज्य घटनेतील मार्गदर्शक तत्वांमधून येतो. ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी सरकार मार्फत आतापर्यंत विविध योजना राबविल्या आहेत याची चर्चा सर्वसमावेशक ग्रामीण विकास योजना या प्रकरणात केली आहे. तसेच प्रस्तुत संशोधनांमधून हे स्पष्ट झाले आहे की शासनाच्या माध्यमातून

राबविण्यात आलेल्या विकास योजना ग्रामीण भागातील अनुसूचित जाती जमाती इतर मागास वर्ग महिला व अल्पभूधारक शेतकरी या सामाजिक व आर्थिक दुर्बल घटक यांच्या विकासासाठी उपयुक्त ठरल्या आहेत त्यामुळे हे गृहीतक सिद्ध होते.

**गृहीतक क:2**

**सर्वसमावेशक ग्रामीण विकास योजना योग्य पध्दतीने राबवणे गरजेचे आहे.**

शासकीय योजनांची अंमलबजावणी करताना लाभार्थीसाठी निकष निश्चित केले जातात. शासनाच्या बहुतांश योजना अनुसूचित जाती जमाती ओबीसी अल्पसंख्यांक महिला आणि आर्थिक दुर्बल घटकांच्या विकासासाठी राबविल्या जातात. त्यामुळे योजनांसाठी निश्चित केलेले पात्रतेचे निकष पूर्ण करणाऱ्या व्यक्तींना या योजनांचा लाभ घेता येतो. पात्रतेचे निकष पूर्ण करणाऱ्यांची संख्या मोठी असते आणि त्या तुलनेत आर्थिक निधी तुटपुंजा असतो अशा वेळी राजकीय पदाधिकाऱ्यांच्या शिफारशीला महत्त्व प्राप्त होते. त्यामुळे नियमानुसार विकास योजनांची अंमलबजावणी होत असली तरी राजकीय पाठबळ नसल्याने ग्रामीण भागातील काही गरजू लोक योजनांच्या लाभापासून वंचित राहिल्याचे मुलाखतीवेळी झालेल्या चर्चेतून दिसून आले. तसेच प्रस्तुत संशोधनामध्ये 3 टक्के लाभार्थी हे नोकरी करणारे असून पात्रतेचे निकष पूर्ण केल्याने त्यांनी योजनांचा लाभ घेतला आहे(**तक्ता क**) काही कुटुंबातील एकाहून अधिक व्यक्तीनीं काही योजनांचा लाभ घेतल्याचे दिसून आले. त्यामुळे संबंधित गावांमधील काही गरीब व गरजू व्यक्ती योजनांच्या फायद्यापासून वंचित राहिल्याचे प्रत्यक्षदर्शी दिसून आले. त्यामुळे हे गृहीतक काही प्रमाणात सिध्द होते.

**गृहीतक क्रमांकः3**

**ग्रामीण विकास योजना ग्रामीण भागात गावपातळीपर्यंत राबविल्या जातात**

भारतामध्ये बलवंतराय मेहता समितीच्या शिफारशीनुसार पंचायतराज संस्था स्थापन करण्यात आल्या. ज्या घटक राज्यांनी त्यांच्या योजनांची अंमलबजावणी पंचायतराज व्यवस्थेवर सोपविली व त्यासाठी त्यांना अधिकार दिले तेथे विकास योजनांची प्रभावी अंमलबजावणी झाली हे स्पष्ट झाल्याने 73 व्या घटनादुरुस्तीद्वारे सर्व राज्यांमध्ये समान त्रिस्तरीय संरचना असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था अस्तित्वात आल्या यामुळे सत्ता व अधिकारांचे विकेंद्रीकरण झाले तसेच केंद्र व राज्य शासनाच्या विकास योजना या संस्थेद्वारे गाव पातळीपर्यंत राबविल्या जातात. तसेच

शासनाच्या माध्यमातून राबविलेल्या ग्रामीण विकास योजना गावपातळीपर्यंत पोहोचण्याचे प्रस्तुत संशोधनाद्वारे दिसून आले यावरून हे गृहीतक सिद्ध होते

**गृहीतक क्रमांकः 4**

**शासकीय योजना सामाजिक व आर्थिक दुर्बल विकासासाठी उपयुक्त आहेत**

शासनाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील अनुसूचित जाती जमाती ओबीसी अल्पसंख्यांक महिला आणि आर्थिक दुर्बल घटकांच्या विकासासाठी राबविल्या आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने पीठ गिरणी मिरची कांडप, पिको फॉल मशीन, सौरकंदील, लोखंडी स्टॉल, डिझेल सारायंत्र, नागर कडबा कुट्टी, डिझेल इंजिन इत्यादी वैयक्तिक लाभाच्या वस्तूंचे वाटप केले आहे या वस्तूंच्या आधारे केल्या जाणाऱ्या व्यवसायातून संबंधित लाभार्थ्यांना आर्थिक उत्पन्नाची साधने उपलब्ध झाली आहेत त्यामुळे लाभार्थ्यांची आर्थिक स्थिती सुधारली आहे (तक्ता क्रमांक 4 व 9) ते स्वावलंबी झाले आहेत यावरून हे गृहीतक सिद्ध होते.

**निष्कर्ष**

निष्कर्ष या संशोधन अभ्यासातून निघालेले प्रमुख निष्कर्ष पुढील प्रमाणे

1.ग्रामीण विकासाच्या योजना समाजातील सामाजिक व आर्थिक दुर्बल घटकांच्या विकासासाठी राबविल्या जातात. त्यामुळे त्यांचा व पर्यायाने राष्ट्राचा सर्वांची विकास होण्यास मदत होते .या योजनांतून दुर्बल घटक शेतकरी शेतमजूर महिला लहान मुले विद्यार्थी इत्यादींना फायदे मिळणे अपेक्षित असते. शासनाच्या माध्यमातून राबविलेल्या या विकास योजना ग्रामीण भागापर्यंत पोहोचल्या आहेत

2.स्थानिक स्वराज्य संस्थांच्या राजकारणात सक्रिय असलेल्या किंवा राजकीय नेतृत्वाची जवळीक असलेल्या व्यक्तींना शासनाच्या योजनांचा अधिक लाभ झाला आहे.

3.शासनाच्या माध्यमातून वाटप करण्यात येत असलेल्या वस्तू साहित्याचा दर्जा सुमार असतो त्यामुळे त्या वस्तू अधिक काळ उपयोगात राहत नाहीत.

4.शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या विकास योजना ग्रामीण भागाच्या विकासासाठी पूरक व उपयुक्त आहेत मात्र त्यांचा लाभ मिळण्यापासून खरे गरजू दूर राहिले आहेत.

5.शासकीय योजनांच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी राजकीय पदाधिकारी आणि प्रशासकीय अधिकारी यांचा समन्वय महत्त्वाचा ठरतो तसे न झाल्यास या विकास योजनांची प्रभावी अंमलबजावणी होत नाही.

6.शासनाच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या वैयक्तिक लाभाच्या योजना महिलांना आर्थिक स्वावलंबन व रोजगारासाठी उपयुक्त ठरल्या आहेत महिला व बालकल्याण विभागाच्या सर्व योजना महिलांच्या आर्थिक विकासाला पूरक ठरल्या आहेत. तसेच समाज कल्याण व कृषी विभागाच्या योजनांचा लाभ महिलांना मिळू लागला आहे ही बाब महिलांच्या सामाजिक प्रतिष्ठेस पूरक ठरते.

7.आर्थिकदृष्टचा कमकुवत असलेल्या कुटुंबातील मुलींना सायकल मिळाल्याने त्यांना शिक्षण घेताना येणारी अडचण कमी झाली. तसेच विधवा किंवा घटस्फोटित महिलांना त्यांचा उदरनिर्वाह करण्यासाठी या योजना अधिक उपयुक्त ठरल्या आहेत त्या स्वावलंबी होऊन आपल्या पाल्यांना शिक्षण देत आहेत.

8.आर्थिकदृष्टचा सक्षम असलेले काही घटक शासकीय योजनांचा पात्रतेचा आधार घेऊन या योजनांचा लाभ घेतात त्यामुळे काही खरे गरजू अशा योजनांच्या लाभापासून वंचित राहिले आहेत. त्यामुळे अशा योजनांसाठी पात्र ते बरोबरच आर्थिक उत्पन्नाचे निकष निश्चित करणे आवश्यक आहे.

9.शासनाच्या माध्यमातून राबविण्यात आलेल्या सर्वसमावेशक ग्रामीण विकास योजना आर्थिकदृष्टचा दुर्बल घटकांच्या विकासाला व आर्थिक स्वावलंबनाचा उपयुक्त ठरल्या आहेत. त्यामुळे सामान्य जनतेचे जीवनमान उंचावले आहे तसेच या योजनांच्या माध्यमातून ग्रामीण विकासाला चालना मिळाली आहे.

10.ग्रामीण भागात जेथे शेतीच्या सिंचनाची व्यवस्था नाही तेथील शेती ही पावसावर अवलंबून आहे. अशा भूमिहीन कोरडवाहू व हंगामी बागायती शेती करणारे शेतकरी शासनाच्या माध्यमातून मिळालेल्या वस्तू यंत्राद्वारे आपला व्यवसाय करतात

11.शासनाच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विविध विकास योजनांची माहिती गावपातळीवरील सरपंच ग्रामपंचायत सदस्य ग्रामसेवक कृषी विकास अधिकारी आणि स्थानिक पातळीवरील सामाजिक कार्यकर्ते यांच्याकडून सामान्य जनतेपर्यंत पोचविली जाते. तसेच पंचायत समिती व जिल्हा परिषदेचे पदाधिकारी योजनांबाबत ची माहिती मतदार संघातील जनतेपर्यंत

पोहोचविण्यात शासनाच्या विविध विकास योजना गावपातळीपर्यंत पोहोचविण्यात स्थानिक स्वराज्य संस्था महत्त्वाची भूमिका पार पाडतात

12.गाव पातळीवरील राजकीय मतभेद आणि गटात गटाच्या राजकारणामुळे स्थानिक पातळीवरील सत्ताधार्याकडून विरोधी गटातील लोकांना विशेष सहकार्य मिळत नाही.

13.शासनाच्या समाजकल्याण महिला व बालकल्याण आणि कृषी विभागाच्या माध्यमातून वाटप करण्यात येणाऱ्या वस्तू संबंधित लाभार्थ्यांना उपयुक्त ठरल्या आहेत तसेच त्यामुळे लाभार्थी स्वावलंबी होत असले तरी ग्रामीण भागातील परिस्थिती व त्यांना वेळोवेळी येणाऱ्या अडचणी यामुळे या योजनांमधून होत असलेली मदत पुरेशी नाही.

14.शासनाच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या योजना महिला व अनुसूचित जाती जमाती यांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी पुरेशा आहेत मात्र या योजनांद्वारे मिळणाऱ्या उत्पन्नातून संपूर्ण कुटुंब चालविणे शक्य होत नाही.

15.अलीकडील काळात वाढत चाललेली महागाई तसेच अन्न वस्त्र निवार याबरोबरच शिक्षण आरोग्य आणि मनोरंजन या माणसाच्या मूलभूत गरजा झाल्या आहेत त्याची पूर्तता करण्यासाठी या योजनांमधून मिळणारे उत्पन्न अपुरे ठरते

16.शासनाच्या माध्यमातून देण्यात येणाऱ्या वस्तूंचा दर्जा चांगला नाही गुणवत्ता चांगली नाही त्यामुळे त्या फार काळ टिकत नाहीत परिणामी शासकीय दप्तरी योजनांची अंमलबजावणी व्यवस्थित होत असली तरी प्रत्यक्ष त्याचा हेतू साध्य होत नाही

17.केंद्र व राज्य आणि स्थानिक संस्था यांच्यामार्फत सर्वसमावेशक ग्रामीण विकासाच्या योजना राबविल्या असल्या तरी आजही दुर्गम भागातील सामान्य जनतेपर्यंत या योजना पोहोचल्या नाहीत

**शिफारशी**

1.शासकीय विकास योजनांची माहिती ग्रामसभेला देण्यासाठी आणि विविध योजनांच्या लाभार्थ्यांच्या निवडीसाठी प्रत्येक गावात एक समिती असावी. या समितीने गावातील खऱ्या गरजूंच्या नावांची यादी तयार करावी. या समितीला कायद्याचा आधार व संरक्षण असावे निवड व समितीने निश्चित केलेल्या लाभार्थ्यांचा नावाला ग्रामसभेची मंजुरी घेण्यात यावी.

2.शासनाने योजनांच्या अंमलबजावणीसाठी सुलभ व सोपी पद्धत अमलात आणावी त्यासंबंधी कर्मचाऱ्यांना पुरेसे प्रशिक्षण देऊन त्यामध्ये सामाजिक जाणीव जागृती निर्माण करावी.

3.शासनाच्या व जिल्हा परिषदेच्या विकास योजना व कार्यक्रम यांची माहिती गावाच्या दर्शनी भागात लावून त्याबाबत जनजागृती करण्यात यावी आणि योग्य तो प्रचार-प्रसार करावा.

4.शासनाच्या व जिल्हा परिषदेच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विकास योजनांतर्गत दिल्या जाणाऱ्या वस्तू चांगल्या दर्जाच्या असाव्यात.

5.विकास योजनांच्या कार्यक्रमात पारदर्शकता यावी यासाठी अधिकारी व कर्मचारी वर्गास विकासाच्या समस्या व त्यांची भूमिका समाजकार्य व नैतिकतेचे प्रशिक्षण द्यावे.

6.योजनेतून मिळणाऱ्या वस्तू उपयोगात आणण्यासाठी किंवा व्यवसायाच्या दृष्टीने वापर करण्यासाठी त्याबद्दल पुरेशी माहिती मिळावी अथवा त्यासाठी छोटे से ट्रेनिंग दिले जावे म्हणजे वस्तू उपयोगात येऊ शकते किंवा त्यांचा वापर करून नवीन छोटा उद्योग सुरू करता येऊ शकतो.

7.महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या मालाला हक्काची बाजारपेठ उपलब्ध करून देण्यात यावी तसेच त्यांनी तयार केलेली उत्पादने सरकारने हमीभावाने खरेदी करावीत.

8.ग्रामीण भागाच्या शाश्वत विकासासाठी पाण्याची उपलब्धता महत्त्वाची असल्याने शासनाने जलसंधारणाच्या कामावर अधिक भर द्यावा.

9.ग्रामीण विकासासाठी सरकारने कृषी विद्यापीठांच्या माध्यमातून कमी पाण्यावर उत्पादन देणाऱ्या बी-बियाणांचा संशोधनाला प्राधान्य देऊन त्याबाबत ग्रामीण शेतकऱ्यांना प्रबोधन करावे

10. शासनाच्या व जिल्हा परिषदेच्या योजना आदिवासी आणि दुर्गम भागातील जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात यावेत

प्रस्तुत लघु संशोधन प्रकल्पामध्ये सांगली जिल्हयातील तासगाव तालुक्यातील सर्वसमावेयाक ग्रामीण विकासासाठी असणाऱ्या योजना, अशा योजनाची अमंलबजावणी येणाऱ्या अडचणींचा,त्यावरती उपाययोजना इत्यादीवर प्रकाश टाकला आहे.